# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक ७ जुलै, २०२५**

## गृह विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - १७**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: बी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५५, पोलीस**<br>**बाब क्रमांक: १०, रूपये:- १७,००,०००/-**<br>**श्री. वरुण सरदेसाई** |
| (१) | ७०९ | १०० | वांद्रे (पूर्व) येथील रोहिंग्या व बांग्लादेशी नागरिकांकडून होणाऱ्या दहशतवादी कृत्ये रोखण्याकरिता दहशतवाद विरोधी कारवाई करण्याकरिता स्थानिक पोलिसाना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता याबाबत, शासनाने निधी उपलब्ध करण्याबाबत करावयाची कार्यावाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: बी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५५, पोलीस**<br>**बाब क्रमांक: १३, रूपये:- २५,६५,१२,०००/-**<br>**श्री. अमिन पटेल** |
| (२) | ७५३ | १० | नागपाडा येथील सोफिया झुबेर रोड वरील पोलिस वसाहतीची पडझड झाली असल्याने तेथे दुरुस्तीचे काम लवकरात लवकर सुरु करणे गरजेचे असणे, तेथे राहणाऱ्या पोलीस कुटूंबियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागणे, तरी सदर वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना. |
| (३) | ७५९ | १० | इमामवाडा पोलिस वसाहत, इमामवाडा रोड भेंडी बाजार येथील पोलिस वसाहतीची पडझड झाली असल्याने तेथे दुरुस्तीचे काम लवकरात लवकर सुरु करणे गरजेचे असणे, तेथे राहणाऱ्या पोलीस कुटूंबियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असणे, तरी सदर वसाहतीची दुरुस्ती करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | ७६० | १० | मांडवी पोलिस वसाहत, मांडवी पोस्ट ऑफिस जवळील पोलिस वसाहतीची पडझड झाली असल्याने तेथे दुरुस्तीचे काम लवकरात लवकर सुरु करणे गरजेचे असणे, तेथे राहणाऱ्या पोलीस कुटूंबियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असणे, तरी सदर वसाहतीची दुरुस्ती करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: बी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५५, पोलीस**<br>**बाब क्रमांक: १६, रूपये:- ३०,००,००,०००/-**<br>**श्री. नानाभाऊ पटोले** |
| (५) | ७१२ | १० | भंडारा जिल्ह्यात साकोली, लाखनी व लाखांदूर पोलिस स्टेशन अंतर्गत ग्रामीण भागामध्ये पोलिस चौकीच्या स्वतंत्र ईमारत नसणे, पोलिस अधिकारी व कर्मचारी यांची अनेक पदे रिक्त असणे, त्यामुळे वाढत्या लोकसंख्येनुसार गुन्हेगारीवर प्रतिबंधक कार्यवाही करण्यास अडचण निर्माण होणे, लाखनी व लाखांदूर तालुक्यात पोलिस कर्मचारी वसाहत नसणे, तसेच तालुक्यातील शहरामध्ये असलेल्या टी पॉईंटवर व गर्दीच्या ठिकाणावर सी.सी.टी.व्ही. कॅमेरा नसणे, याबाबत शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (६) | ७८३ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही पोलीस ठाण्यातील कार्यरत असलेल्या पोलिस अधिकारी, पोलिस कर्मचारी यांना चोविस तास काम करावे लागणे, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न बघता या सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना पोलिस स्टेशन परिसरातच वसाहतीमध्ये राहणे अत्यंत आवश्यक असणे, याकरिता पोलिस स्टेशन परिसरातच अधिकारी व कर्मचारी यांचे निवासस्थानाचे बांधकाम करणे आवश्यक असणे, सिंदेवाही येथे अधिकारी व कर्मचारी यांच्या करिता किमान ५० निवासस्थानाची आवश्यकता असणे, याकरिता लोकप्रतिनिधीनी पाठपुरावा करून सुध्दा अघापही या प्रस्तावास मंजूरी मिळालेली नसल्यामुळे कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थानापासून वंचित राहावे लागणे, चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही येथील पोलिस स्टेशन येथे कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या करिता निवासस्थानाचे बांधकाम करण्याच्या प्रस्ताव राज्य पोलिस हाऊसिंग महामंडळाकडे प्रलंबित असल्याने या प्रस्तावास निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ७८४ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सावली तालुक्यातील पाथरी पोलीस ठाण्यातील कार्यरत असलेल्या पोलिस अधिकारी, पोलिस कर्मचारी यांना चोविस तास काम करावे लागणे, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न बघता या सर्व अधिकारी आणि कम्रचारी यांना पोलिस स्टेशन परिसरातच वसाहतीमध्ये राहणे अत्यंत आवश्यक असणे, याकरिता पोलिस स्टेशन परिसरातच अधिकारी व कर्मचारी यांचे निवासस्थानाचे बांधकाम करणे आवश्यक असणे, पाथरी येथे अधिकारी व कर्मचारी यांच्या करिता किमान ५० निवासस्थानाची आवश्यकता असणे, याकरिता लोकप्रतिनिधीनी पाठपुरावा करून सुध्दा अघापही या प्रस्तावास मंजूरी मिळालेली नसल्यामुळे कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थानापासून वंचित राहणे, चंद्रपूर जिल्हयातील सावली तालुक्यातील पाथरी येथील पोलिस स्टेशन येथे कार्यरत असलेल्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अधिकारी व कर्मचारी यांच्या करिता निवासस्थानाचे बांधकाम करण्याच्या प्रस्ताव राज्य पोलिस हाऊसिंग महामंडळाकडे प्रलंबित असल्याने या प्रस्तावास निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: बी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०१४, न्यायदान**<br>**बाब क्रमांक: १८, रूपये:- ५,३८,००,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (८) | ७७२ | १० | पोलीस उपमहानिरीक्षक, सायबर मुंबई यांच्या अधिनस्त राबविण्यात येत असलेल्या सायबर सुरक्षा प्रकल्पाच्या विविध खर्चासाठी निधीची तरतुद असणे, मात्र संपूर्ण महाराष्ट्रात तरीही सायबर गुन्ह्यांचं प्रमाण वाढणे, नागरिकांची सायबर गुन्हेगारांकडून आर्थिक फसवणूक होणे, सायबर गुन्हे रोखण्यात सायबर शाखा अयशस्वी ठरणे, अद्ययावत तंत्रज्ञानाचा अभाव असणे, सायबर तज्ञांची कमतरता असणे परिणामी फसवणूक झालेल्या नागरिकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत पोलीस उपमहानिरीक्षक, सायबर मुंबई यांच्या अधिनस्त राबविण्यात येत असलेल्या सायबर सुरक्षा प्रकल्पाच्या माध्यमातून शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: बी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०१४, न्यायदान**<br>**बाब क्रमांक: १९, रूपये:- ५,३८,००,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (९) | ७६६ | १० | डायल - ११२ प्रकल्प (कार्यक्रम) च्या माध्यमातून हेल्पलाईन अधिक प्रभावी करण्यासाठी प्रयत्न सुरु असणे, यासाठी निधीचीही तरतुद केली जाणे, मात्र ही हेल्पलाईन अस्तित्वात आल्यानंतरही अनेक प्रक्रियांसाठी नागरिकांना पोलीस स्थानकांच्या पायऱ्या झिजवाव्या लागणे, अनेक प्रक्रिया अजूनही ऑफलाईनच असणे, डायल - ११२ प्रकल्प (कार्यक्रम) अंतर्गत ११२ हेल्पलाईन अधिक लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: बी-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०३९, राज्य उत्पादन शुल्क**<br>**बाब क्रमांक: २४, रूपये:- ३,८७,४९,०००/-**<br>**श्री. वरुण सरदेसाई** |
| (१०) | ७१३ | १०० | वांद्रे (पूर्व) येथील मा. निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, वांद्रे पूर्व यांचे कार्यालय उच्च न्यायालयाच्या प्रस्तावित इमारतीमुळे अन्यत्र विस्थापित होत असणे, परंतु अद्याप पर्यंत सदर इमारतीस अन्य पर्यायी जागा मिळालेली नसणे, कलानगर उड्डाणपुलाखालील राज्य उत्पादन शुल्काच्या नवीन कार्यालयाचे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अद्याप लोकार्पण केलेले नसणे, यामुळे राज्य उत्पादन शुल्क आयुक्त कार्यालयातील सोई सुविधांबाबत वांद्रे विभागातील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय नव्याने तयार करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: बी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५५, मार्ग परिवहन**<br>**बाब क्रमांक: ३०, रूपये:- २,०००/-**<br>**श्री. वरुण सरदेसाई** |
| (११) | ७१० | १०० | वांद्रे (पूर्व) येथील पश्चिम द्रुतगती महामार्गावर सातत्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते, महामार्गावरील खेरवाडी उड्डाणपूल व सांताक्रूझ उड्डाणपूल येथे सातत्याने होणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील वाहतूक कोंडीमुळे वारंवार अपघातांची संख्या वाढली आहे, तसेच पश्चिम द्रुतगती महामार्गावरील सर्विस रोड वर देखील वावाहातुक कोंडी मोठ्या प्रमाणावर होते, यामुळे या मार्गावरून पायी प्रवास करणाऱ्या पादचारी नागरिकांना याचा मोठा त्रास होतो, तसेच पादचारी नागरिकांच्या अपघाताचे प्रमाण देखील वाढले आहे. तरी पश्चिम द्रुतगती महामार्गावर इंटेलीजेंट ट्राफिक मॅनेजमेंट सिस्टीम प्रकल्प राबविण्यात यावा याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ७११ | १०० | वांद्रे (पूर्व) येथील वांद्रे कुर्ला संकुल येथे नोकरदार वर्ग व व्यावसायिक वर्गाच्या मोठ्या प्रमाणात वाहनांच्या वर्दळीमुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकाना वाहतुक कोंडीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वांद्रे कुर्ला संकुल येथे पासपोर्ट कार्यालय, पोलिसांची महत्वाची कार्यालये, कार्पोरेट कार्यालये आदि महत्वाची कार्यालये यथिअकनि असल्याने इंटेलिजेंट ट्राफिक मॅनेजमेंट सिस्टीम प्रकल्प राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: बी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५६, तुरुंग**<br>**बाब क्रमांक: ३२, रूपये:- ५,००,००,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (१३) | ७०७ | १०० | पुणे येथील येरवडा मध्यवर्ती कारागृह हे राज्यातील एक महत्त्वाचे व ऐतिहासिक कारागृह असून, सध्या या कारागृहाच्या इमारती व परिसरात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर जीर्णावस्था निर्माण झालेली असणे, यामध्ये विशेषतः कैद्यांसाठी स्वच्छ व सुरक्षित निवास सुविधा: जुन्या व गंजलेल्या इमारती, गळकी छप्परे, अपुरी व अकार्यक्षम स्वच्छता व्यवस्था, ड्रेनेज व पाण्याची व्यवस्था: ड्रेनेज लाईन वारंवार तुंबते व पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था नसल्याने ती करणे, सुरक्षा प्रणाली: |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सीसीटीव्ही प्रणाली जुनी व अपुरी आहे, नवीन प्रणाली बसविणे आवश्यक, आरोग्य सेवा: कैद्यांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्राची सुधारणा करणे आवश्यक, पुनर्वसन व कौशल्यविकास: बंदींना उपयुक्त ठरतील अशी संगीत, हस्तकला, व प्रशिक्षण कार्यशाळा सुरू करणे, जेणेकरून त्यांचे पुनर्वसन सुलभ होईल. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१४) | ७६७ | १० | मध्यवर्ती कारागृहातील व्हीसी क्युबिकल्स व बॅरेक दुरुस्ती यावरील खर्चासाठी निधीची तरतुद असणे, ठाणे जिल्हा कारागृहामध्ये क्षमतेपेक्षा जास्त कैदी असणे, १,१०५ कैदी ठेवण्याची क्षमता असून सुमारे ४, ५०० कैदी असणे, या कारागृहामध्ये मुलभूत सुविधांचा अभाव असणे, क्षमतेपेक्षा जास्त कैदी असल्यामुळे विविध प्रश्न निर्माण होणे, कारागृहाची दुरावस्था झालेली असणे, पिण्याच्या पाण्याची समस्या असणे, स्वच्छतागृहांची स्थिती खूपच खराब असणे कारागृहाची क्षमता वाढविणे व अन्य सुविधा निर्मितीसाठी मध्यवर्ती कारागृहातील व्हीसी क्युबिकल्स व बॅरेक दुरुस्ती या निधीच्या माध्यमातून शासनाचे करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | ७६८ | १० | मध्यवर्ती कारागृहातील व्हीसी क्युबिकल्स व बॅरेक दुरुस्ती यावरील खर्चासाठी निधीची तरतुद असणे, आर्थररोड कारागृहामध्ये क्षमतेपेक्षा जास्त कैदी असणे, ८०४ कैदी ठेवण्याची क्षमता असून सुमारे ३००० कैदी असणे, या कारागृहामध्ये मुलभूत सुविधांचा अभाव असणे, क्षमतेपेक्षा जास्त कैदी असल्यामुळे विविध प्रश्न निर्माण होणे, कारागृहाची क्षमता वाढविणे व अन्य सुविधा निर्मितीसाठी मध्यवर्ती कारागृहातील व्हीसी क्युबिकल्स व बॅरेक दुरुस्ती या निधीच्या माध्यमातून शासनाचे करावयाची कार्यवाही व उपाययोजना.. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: बी-१०**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५५, पोलिसांवरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ३६, रूपये:- ५,००,००,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (१६) | ७२५ | १० | पुणे शहरात गेल्या काही वर्षांत सायबर गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली असणे, विशेषतः आर्थिक फसवणुकीची प्रकरणे, ऑनलाईन फ्रॅाड, फिशिंग, सोशल मीडिया माध्यमातून होणारे गुन्हे अशा स्वरूपाच्या घटनांनी सामान्य नागरिक हैराण झालेला असणे,सध्या सायबर गुन्ह्यांच्या प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असणे, पुणे पोलीस आयुक्तालयामार्फत सादर केलेला ५ सायबर पोलीस ठाण्यांचा प्रस्ताव अद्याप शासनाच्या मान्यतेच्या प्रतिक्षेत असणे, पुणे शहराच्या वाढत्या लोकसंख्येप्रमाणे सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे अशा गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांचा वेगवान तपास होण्यासाठी व प्रतिबंधासाठी स्वतंत्र सायबर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | पोलीस ठाण्यांची नितांत गरज आहे. प्रस्तावित सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित झाल्यास नागरिकांना वेळेवर न्याय मिळण्यास मदत होईल, तक्रारींचे निवारण जलदगतीने होईल, तसेच गुन्हेगारांवर वचक बसेल त्यामुळे पुणे पोलीस आयुक्तालयाच्या प्रलंबित ५ सायबर पोलीस ठाण्यांच्या प्रस्तावा ला शासनाने मंजुरी देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: बी-१०**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५५, पोलिसांवरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ३७, रूपये:- १०,००,००,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (१७) | ७०६ | १० | वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघातील लोकसंख्या झपाट्याने वाढत असणे, धानोरी, कळस, विश्रांतवाडी, येरवडा, कल्याणीनगर, महाराष्ट्र हाउसिंग बोर्ड (नागपूर चाळ), विमाननगर, वडगाव शेरी, खराडी, लोहगाव या परिसरात पुणे जिल्ह्यासह इतर जिल्ह्यांतून तसेच राज्याबाहेरून मोठ्या प्रमाणात नागरिक स्थलांतर करून येत असणे, त्यामुळे या भागातील नागरी वर्दळ आणि वाहतुकीचा भार वाढलेला असल्याने या परिसरात महिलांच्या दागिन्यांची चोरी, मोबाईल चोरी, अपघात, आणि रात्रीच्या वेळी शस्त्र बाळगून फिरणारे गुंड प्रवृत्तीचे लोक आढळून येत आहेत. चोरी, दरोडे यांसारख्या गुन्ह्यांचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत असणे, ही परिस्थिती टाळण्यासाठी आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी परिसरातील मुख्य रस्त्यांवरील प्रमुख चौकांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे अत्यावश्यक, याबाबत प्रमुख चौकांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ४ जुलै, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) गृह विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई